पीएच.डी. संशोधन आराखडा

"अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील शैलीचा विवेचक अभ्यास"

कला विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी.
(विद्या वाचस्पती) या पदवीकरीता

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

यास शोध प्रबंधाचा आराखडा सादर

संशोधक
देविदास बाबूराव गायकवाड
एम.ए.,बी.एड., नेट (मराठी)

मार्गदर्शक
प्रा.डॉ.सुशीलप्रकाश यादवराव चिमोरे
मराठी विभाग प्रमुख
श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर

: संशोधन केंद्र :
श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर

जून - २०१७

(१) प्रस्तावना :

साहित्य हा समाज जीवनाचा आरसा आहे. मराठी साहित्यामध्ये निसर्ग व देवता हे विषय घेऊन अनेक कवी, कथाकार, नाटककार, कादंबरीकार इत्यादी लेखक मंडळींनी लेखन केले; पण स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षण घेऊन लेखकांनी नवीन विषय हाताळले आहेत. १९६० नंतर खऱ्या अर्थाने दलित, ग्रामीण, आदिवासी, स्त्रीवादी, आंबेडकरवादी, मार्क्सवादी तौलनिक साहित्य इत्यादी साहित्याचा उदय झाला. दलित साहित्य हे वास्तववादी स्वरूपाचे वळण घेताना दिसून आले.

मराठी साहित्यामध्ये अण्णा भाऊ साठे यांनी नव्या वाङ्मयीन जीवन जाणिवा व विविध वृत्ती-प्रवृत्तींचे दर्शन घडविणारे साहित्य निर्माण केले. अण्णा भाऊ साठेंनी दलित, ग्रामीण भटक्या जीवनाला, कामगारविषयक जीवन, तमाशा कलावंतांचे जीवन, सुगीसाठी एकत्रित जमलेल्या अठरापगड जाती-जमातीच्या वेदना आपल्या साहित्यकृतींमधून आविष्कृत केल्या आहेत. त्यामुळेच अण्णाभाऊंच्या साहित्याचे आशयविश्व कोणकोणत्या समाजगटाचे प्रतिनिधित्व करते तसेच त्यांच्या साहित्यलेखनातील शैलीचा विवेचक अभ्यास करणे संशोधकाला आवश्यक वाटते.

अण्णा भाऊ साठे यांनी कथा, कादंबरी, नाटक, लोकनाट्य, पोवाडा, प्रवासवर्णन अशा सर्वच साहित्याच्या अनुषंगाने लेखन केले आहे. वाचक व समीक्षकांनी त्यांच्या साहित्याला मान्यताही दिली आहे. त्यांच्या साहित्याचे संशोधन झाले आहे; पण अण्णाभाऊंची साहित्यातील शैली कशा प्रकारची आहे, याचा शोध कोणत्याही संशोधकाने घेतला नाही. त्यासाठी मी संशोधक म्हणून "अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील शैलीचा विवेचक अभ्यास" हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

(२) संशोधन विषयाचे महत्त्व :

अण्णा भाऊ साठे यांनी कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, लोकनाट्य, शाहिरी वाङ्मयात विपूल लेखन केले आहे. त्यांच्या साहित्यावर वेगवेगळ्या विषयाच्या अनुषंगाने संशोधन झालेले आहे. हे खरे असले तरी अण्णाभाऊंच्या साहित्यातील शैली विचाराचे स्वरूप या अनुषंगाने त्यांच्या साहित्याचे संशोधन करावयाचे आहे. अण्णाभाऊंच्या व्यक्तिमत्त्वाचा त्यांच्या शैलीवर तसेच परिसराचा, परिस्थितीचा, संस्कृतीचा कसा परिणाम झालेला आहे, अण्णाभाऊंच्या साहित्यलेखनाच्या शैलीचे वेगळेपण, त्यांच्या शैलीवर इतरांचा झालेला प्रभाव, त्यांच्या लेखनशैलीतील सामर्थ्यस्थळे याचा शोध या संशोधनात घ्यावयाचा आहे.

(३) गृहितके :

(१) अण्णा भाऊ साठे यांच्या लेखनशैलीवर पश्चिम महाराष्ट्राच्या भाषेचा प्रभाव जाणवतो.

(२) पश्चिम महाराष्ट्राच्या संस्कृतीचा प्रभाव त्यांच्या लेखनशैलीवर झालेला दिसून येतो.

(३) अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिभा आणि परिस्थिती यांचा प्रकार लेखनशैलीवर आढळतो.

(४) व्यक्तित्त्वाचा प्रभाव त्यांच्या साहित्यावर पडलेला आहे.

(५) अण्णाभाऊंच्या लेखनशैलीवर मार्क्सवादी व आंबेडकरवादी विचारांचा प्रभाव दिसून येतो.

(६) अण्णाभाऊंची लेखनशैली वेगळ्या जीवन जाणीवेतून तयार झालेली पहावयास मिळते.

(७) अण्णाभाऊंची लेखनशैली कल्पनेत न रमता वास्तवात रममाण होणारी पहावयास मिळते.

(४) विषयाची व्याप्ती व मर्यादा :

अण्णा भाऊ साठे यांनी मराठी साहित्यातील जवळजवळ सर्वच वाङ्मय प्रकाराचे लेखन केले आहे. कथा, कादंबरी, नाटक, लोकनाट्य, प्रवासवर्णन, शाहिरी वाङ्मय यातील सामाजिक जाणिवा, मार्क्सवादी विचार, आंबेडकरवादी विचार, मूल्यविचार, अण्णाभाऊंच्या साहित्यातील स्त्री व्यक्तिरेखा, पुरुष व्यक्तिरेषा, अण्णाभाऊंच्या शाहिरी वाङ्मयाचा समग्र अभ्यास, अण्णाभाऊंच्या साहित्यातील तत्त्वज्ञान, विद्रोही जाणिवा, झोपडपट्टीचे चित्रण, महानगरीय जाणिवा, कामगाराचे जीवनचित्रण, अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक, ऐतिहासिक, अण्णा भाऊ साठे व्यक्ती आणि वाङ्मय अशा वेगवेगळ्या अंगानी अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा अभ्यास करू शकलो असतो. त्यांच्या साहित्य लेखनातील विषयाची व्याप्ती विविधांगी आणि व्यापक स्वरूपाची असली तरी मी माझ्या संशोधनासाठी “अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील शैलीचा विवेचक अभ्यास” हा संशोधनासाठी विषय घेतलेला आहे, हीच माझ्या संशोधाची मर्यादा आहे.

(५) संशोधनाची उद्दिष्ट्ये :

(१) अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील शैलीविचाराचा अभ्यास करणे.

(२) अण्णाभाऊंच्या शैलीविचारांचे वेगळेपण कसे आहे, याचा शोध घेणे.

(३) अण्णाभाऊंच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि त्यांच्या शैली विचारांचा परस्पर अनुबंधाची जाणीव करून घेणे.

(४) वंश, काळ, परिस्थितीचा अण्णाभाऊ साठेंच्या जीवनविचारांवर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

(५) मार्क्सवादी आणि आंबेडकरवादी विचारधारेचा अण्णाभाऊंच्या शैलीविचारांवर कसा परिणाम झालेला आहे याचा शोध घेणे.

(६) अण्णाभाऊंच्या शैलीविचारातील सामर्थ्य आणि मर्यादांचा शोध घेणे.

(५) संशोधन पद्धती :

एखाद्या विषयावर संशोधन करण्यासाठी किंवा ते संशोधन सर्वांगाने होण्यासाठी वेगवेगळ्या अंगाने, वेगवेगळ्या विचाराने, वेगवेगळ्या संशोधनाच्या पद्धतीने संशोधन केल्यास हे संशोधन अधिक चांगल्या प्रकारे होण्याची शक्यता असते. त्यासाठी चरित्रात्मक, ऐतिहासिक, सामाजिक मार्क्सवादी, मानसशास्त्रीय, आस्वादक, सौंदर्यवादी, आंबेडकरवादी, तौलनिक, वर्णनात्मक, शैलीवादी इत्यादी संशोधन पद्धतीचा उपयोग संशोधन पद्धतीमध्ये करण्याचा प्रयत्न करणार आहे.

(६) प्रकरण योजना

"अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील शैलीचा विवेचक अभ्यास"

प्रकरण १ ले साहित्यनिर्मिती प्रक्रिया आणि शैली विचार

साहित्य म्हणजे काय?, प्रतिभा, स्फूर्ती, व्यासंग, संकल्पना अभ्यास, तत्कालीन समाजजीवन आणि अण्णाभाऊंचे साहित्य, शैलीची व्याख्या, संकल्पना, शैलीचे स्वरूप, शैलीचे विशेष

प्रकरण २ रे अण्णा भाऊ साठे यांच्या कथासाहित्यातील शैली

१) प्रास्ताविक

२) अण्णाभाऊंच्या कथालेखनाची शैली

३) अण्णाभाऊंच्या कथेतील निवेदनशैली

४) अण्णाभाऊंच्या कथेतील व्यक्तिचित्रणात्मक शैली

५) अण्णाभाऊंच्या कथेतील वर्णन कौशल्याचे स्वरूप

६) अण्णाभाऊंच्या कथेतील संवाद शैलीचे स्वरूप

७) अण्णाभाऊंच्या कथेतील वातावरण निर्मितीची शैली

प्रकरण ३ रे अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील शैलीचे स्वरूप

१) प्रास्ताविक

२) अण्णाभाऊंच्या लेखनातील आशयशैली

३) अण्णाभाऊंच्या कादंबरीतील निवेदनशैली

४) अण्णाभाऊंच्या कादंबरीतील वर्णन कौशल्याची शैली

५) अण्णाभाऊंच्या कादंबरीतील संवाद शैलीचे स्वरूप

६) अण्णाभाऊंच्या कादंबरीतील वातावरण निर्मितीची शैली

७) अण्णाभाऊंच्या कादंबरीतील लोकसंस्कृतीविषयक शैलीचे स्वरूप

प्रकरण ४ थे अण्णा भाऊ साठे यांच्या नाटक आणि लोकनाट्यातील शैली

१) प्रास्ताविक

२) नाटकाची संविधानकाराची शैली

३) संवाद, संघर्ष, घटनाप्रसंग, समाजजाणिवा, व्यक्तिचरित्रात्मक जीवनदर्शन घडविणारी शैली

४) लोकनाट्यातील आशयशैली

५) लोकनाट्याच्या व्यक्तिचित्रणातील शैलीदर्शन

६) लोकनाट्यातील संघर्षात्मक शैली

७) लोकनाट्यातील संवादरूपी शैली

८) लोकनाट्यातील मानवी जीवन जाणिवा घडविणारी शैली

९) लोकनाट्यातील वर्णनकौशल्याची शैली

१०) लोकनाट्यातील वातावरणनिर्मितीची शैली

प्रकरण ५ वे अण्णा भाऊ साठे यांच्या प्रवासवर्णनातील शैलीचे वेगळेपण

१) प्रास्ताविक

२) प्रवासवर्णन संकल्पनेचे स्वरूप

३) प्रवास वर्णनातील आशयशैली

४) प्रवास वर्णनातील वर्णन शैलीचे स्वरूप

१) घटना २) प्रसंग ३) व्यक्ती ४) निसर्ग ५) यांत्रिक जीवन ६) शहरी लोकजीवन इत्यादी

५) प्रवासवर्णनातील संवादशैली

६) प्रवासवर्णनातील रशियाची समाजदर्शनात्मक शैली

७) लेखकाच्या अनुभवाची शैली

प्रकरण ६ वे अण्णाभाऊंच्या शैलीचे निष्कर्षात्मक विवेचन

प्रकरण पहिले ते पाचव्या प्रकरणापर्यंत संशोधनांती जे निष्कर्ष हाती आले आहेत. त्याचा ऊहापोह मी या प्रकरणात सादर करणार आहे.

संदर्भ

१) परिशिष्ट

२) आधारभूत ग्रंथ

३) दुर्मीळ छायाचित्रे

(७) संदर्भ ग्रंथ सूची

१)	कठाळे नानासाहेब	'अण्णा भाऊ साठे : जीवन आणि साहित्य' समता प्रकाशन, नागपूर, द्वितीयावृत्ती, १७ फेब्रु.२००१
२)	गुरव डॉ.बाबुराव	'अण्णा भाऊ साठे', लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई, अकरावी आवृत्ती फेब्रुवारी २०१३.
३)	कऱ्हाडे डॉ.सदा	'अण्णा भाऊ साठे : व्यक्तित्व आणि कर्तृत्व' लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २६ जाने. २००९
४)	गादेकर डॉ.माधव	'अण्णा भाऊ साठे : साहित्य मूल्यमापन' साद प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९ जुलै २०११

५)	कोरडे बजरंग	'भारतीय साहित्याचे निर्माते अण्णा भाऊ साठे' साहित्य अकादमी दिल्ली, पाचवी आवृत्ती २०११
६)	साठे दिनकर सहदेव	'अण्णा भाऊंच्या आठवणी' संकेत प्रकाशन, नागपूर, १ ऑगस्ट २००७
७)	सकटे मच्छिंद्र	'अण्णा भाऊ साठे : एक सत्यशोधक' प्रज्ञा प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती ३ जाने. २००५
८)	साठे विठ्ठल	'अण्णा भाऊ साठेंच्या कथा : सामाजिक आविष्कार' सुयश प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती ३१ डिसेंबर २००४
९)	मालशे मिलिंद (संपा)	'शोधनिबंधाची लेखन पद्धती', लोकवाङ्मयगृह, मुंबई, १-३-१९७५
१०)	वानखेडे चंद्रकांत (संपा)	'अण्णा भाऊ साठे साहित्य दर्शन', संकेत प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती ६ डिसेंबर २००७
११)	अण्णा भाऊ साठे यांचे समग्र साहित्य	महाराष्ट्र शासन

मार्गदर्शक
प्रा.डॉ.सुशीलप्रकाश यादवराव चिमोरे
मराठी विभाग प्रमुख
श्री हावगीस्वामी महाविद्यालय,उदगीर

संशोधक
देविदास बाबूराव गायकवाड